# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४**

## ग्रामविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एल-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- ५८,५९,६०,५२,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (१) | ६३४९ | १०० | पालघर जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून ते आज पर्यंत हजारो कामगार बाह्यस्रोताद्वारे कंत्राटी कामगार म्हणून काम करीत असल्याची निदर्शनास येणे, पालघर जिल्हा परिषदची भरती न झाल्याने जिल्हा परिषदेचा कार्यभार कंत्राटी कर्मचाऱ्यावर अवलंबून असल्याने जनहिताची कामे विलंब होत असल्याने सर्वसामान्य जनतेतून तसेच पालघर जिल्हा परिषदेत बाह्य स्त्रोताद्वारे काम करणारे कर्मचारी यांना कोणतेच लाभ मिळत नसल्याने तेही आर्थिक समस्येत येत असणे, या कर्मचाऱ्यांनी कोविड काळात काम करून हीं त्यांचा विमा सुद्धा शासनाने काढलेला नसणे, त्यामुळे त्यांचे कुटुंबीय आरोग्याच्या लाभापासून वंचित असणे,पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असल्याने या जिल्ह्यातील पेसा भरतीही तात्काळ करावी अशी मागणी आदिवासी समाजाची असून या जिल्ह्यात व जिल्हा परिषदेतील सर्व पदे तात्काळ भरून या जिल्ह्याला न्याय देण्याची मागणी सर्वसामान्य जनता व लोकप्रतिनिधीकडून होत असणे त्याचबरोबर ओडिसा राजस्थान या राज्यांमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात आल्याचे समजते त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना विशेष करून पालघर या आदिवासीबद्दल जिल्ह्यातील बाह्य स्त्रोताद्वारे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- ७२,४१,७१,१६,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (२) | ६३६५ | १० | माझे राजुरा (जिल्हा चंद्रपूर) विधानसभा मतदार संघातील राजुरा व गोंडपिपरी पंचायत समितीची इमारतीचे बांधकाम सन १९६०-६२ मध्ये झाले असुन सदर दोन्ही इमारती कौलारू असल्याने क्षतीग्रस्त झालेल्या असून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी गळत असल्याने कामकाजाच्या दृष्टिकोनातून गैर सोईचे झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी पंचायत समिती इमारतीचे बांधकाम कारण्यातची मागणी केलेली आहे. नागरिकांची मागणी लक्षात घेता जिल्हा परिषद बांधकाम चंद्रपूर यांनी अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. मात्र मंजुरी अभावी सदर प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे प्रलंबित असल्याने अद्यापही इमारत बांधकाम सुरु करता आलेले नसणे परिणामी नागरिकात पसरत असलेले तीव्र असंतोष, राजुरा व गोंडपिपरी पंचायत समितीची इमारतीचे तातडीने बांधकाम करण्याकरिता उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. कुणाल पाटील** |
| (३) | ६४९५ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील कुंडाणे -वरखेडी -बाळापूर -फागणे रस्ता प्रजिमा 51 वरील पांझरा नदीवरील पुलाच्या पोचमार्गाचे बांधकाम व स्ल्याब ड्रेन चे काम करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होणे , शेतकऱ्यांना येत जाता होणारा त्रास थांबवा यासाठी सदर मागणी लक्ष्यात घेता या ठिकाणी पुलाचे बांधकाम करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ६४९६ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील कुसुंबा ते सुट्रेपाडा , उभंड ते पिंपरखेड, तसेच आर्वी- मोघन- बोरकुंड ते शिरूड रस्ता, रा.मा. ७ ते देशशिरवाडे - अजनाळे - पाडळदे - रावेर - चितोड -धुळे - बिलाडी - न्याहळोद - कौठळ - बेटावद ते राज्य सिमा रस्ता रा.मा. १६ किमी या या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांना येता जातांना अतोनात त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, परिणामी सदर रस्त्यांचे तातडीने खडीकरण व डांबरीकरण करून नुतनीकरण करणेबाबत शासनाने वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६४९७ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील देऊर - नांद्रे - उभंड रस्ता, कावठी ते शिरधाने रस्ता, रामनगर ते बुरझड रस्ता, गोंदुर - वार - कुंडाणे - सांजोरी - पाडळदे रस्ता, दापुरा - धनुर - कापडणे - धमाणे - नगाव ते रा.मा.६० तसेच नंदाळे - बोरकुंड - मांडळ - धाडरे - पुरमेपाडा - बेंद्रेपाडा -ते राममा क्रमांक ३ वरील रस्त्यांची दुरावस्था झालेली असून परिसरातील शेतकरी व नागरिकांना येता - जातांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. परिणामी सदर रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करून नुतनीकरण करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६५११ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील राममा - ६ ते अजंग - अंबोडे - नवलनगर - मोहाडी -कापडणे - राममा -३ सरवड नंदाने - बुरझड - लामकानी - निजामपूर - ब्राम्हणवेल - कोंडाइबारी ते राममा - ६ रस्ता या रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झालेली असून परिसरातील शेतकरी व नागरिकांना तसेच प्रवाशांना येता - जातांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. परिणामी सदर रस्त्यांचे तातडीने खडीकरण व डांबरीकरण करून नुतनीकरण करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | ६५१३ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील बोरीस रामा -१३ निकुंभे - ढढाणे - धोंडी - नगाव - बिलाडी - शिरधाने - नावरा - नावरी - ते रामा - १३ प्रजिमा - ५३ की.मी. १६/५०० मध्ये लहान पुलांचे पोचमार्गासह बांधकाम करणेची मागणी होणे, सदर मागणी लक्ष्यात घेता या ठिकाणी लहान पुलांचे बांधकाम करणेसाठी तातडीने निधीला मंजुरी देऊन सदर काम करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (८) | ६३६७ | १० | शिरगांव रहाटी वाडी (ता.चिपळून, जि.रत्नागिरी) येथील ब्राम्हणवाडीला लागून नाला असणे, वाडीत पाणी साचत असणे, त्यामुळे नाल्याला संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, नाल्यातील पाणी घरात शिरत असणे, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६३६८ | १० | पेटपिंपळगाव ते तांबूलगाळ मुदखेड सिमेगाव (ता.पालम,जि.परभणी) हा रस्ता ग्रामीण रस्त असून रस्त्याची लांबी ७ कि.मी.असणे, रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, रस्त्यावर खड्डे पडले असणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य झाला असणे, रस्ता सन २०२४-२०२५ च्या प्रारुप आराखडयात समाविष्ठ असणे, मात्र शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६३८० | १० | ओझर (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) निर्मलग्रुप ग्राम पंचायत कार्यालय ते ओझर पूल मुख्य रस्ता पर्यंत लागून वहाड असणे, पावसाळ्यात ग्रामपंचायत कार्यालय आणि आजूबाजूच्या जमिनीत पावसाचे पाणी साचत असणे, त्यामुळे वहाडला संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, पावसाळ्यात वहाडाचे पाणी कार्यालयत व घरात शिरत असणे, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ७२,४१,७१,१६,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (११) | ६३४८ | १०० | पालघर जिल्ह्यातील डहाणू विधानसभा क्षेत्रातील आरोग्य व्यवस्था सुधारावी म्हणून राज्य शासनाने माहे फेब्रुवारी २०१९ रोजी मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र अस्वली येथील मुख्य इमारत व निवासी इमारतीचे बांधकाम करणे करिता ०७ कोटी ७१ लाख ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर करूनही अद्यापही या कामास कोणत्याही प्रकारची सुरुवात झालेली नसणे, सदर रुग्णालय हे जिल्हा परिषद पालघर च्या आरोग्य विभाग यांच्या अखत्यारीत येत असतानाही प्रशासनाकडून जाणीवपूर्वक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दुर्लक्ष होत असल्याने त्यांच्यांवर ठोस कार्यवाही कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत असणे, आरोग्य विभागाच्या या गलथान कारभारामुळे रुग्णांना मुंबई, गुजरात व केंद्रशासित प्रदेश असलेल्या सिल्वासा या ठिकाणी उपचाराकरिता जावे लागत असणे, तसेच रुग्ण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जात असताना प्रचंड प्रमाणात असलेली वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिनिकेतच रुग्णांचे प्राण जात असणे, त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये तसेच सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष निर्माण झालेला असणे, उक्त बाबी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सतत राज्य शासनाची पाठपुरावा करत निदर्शनास आणून ही कोणतीच उपाययोजना केलेली नसणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५०१, ग्रामविकासासाठी विशेष कार्यक्रम**<br>**रूपये:- ७२,४१,७१,१६,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (१२) | ६३७६ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकाना पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करुन देणेसाठी लाखो रुपये खर्च करून सर्व ग्रामपंचायतींमध्ये जलशुद्धीकरण यंत्र दोन ते तिन वर्षापुर्वी बसविण्यात आले. मात्र आज अनेक संयंत्र बंद पडले असून जलशुद्धीकरण यंत्र दुरूस्त करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे निधीच उपलब्ध नाही. त्यामुळे शुध्द पाण्याअभावी नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून अनेक आजारांना तोड दयावे लागत आहे. हे सयंत्र तातडीने दुरूस्त करून शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करून दयावे अशी मागणी नागरिकांना वारंवार करून सुध्दा याकडे शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष्य त्यामुळे नागरिकात पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी बंद पडलेले जलशुद्धीकरण यंत्र दुरूस्त करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (१३) | ६५०५ | १० | इस्लामपूर विधानसभा मतदारसंघातील बावची, गोटखिंडी, बागणी, किल्ले मच्छिंद्रगड, बेरडमाची, वाळवा, तुजारपुर व अन्य गावातील पाणी पुरवठा योजना गेली दोन ते तीन वर्षे पूर्ण झालेल्या नाहीत. तसेच काही ठिकाणी पाण्याची टाकी, जॅकवेल व अन्य बाबींची पूर्तता न करता कंत्राटदाराने थेट गावात पाणी वितरणासाठी पाईपलाईन घातल्या आहेत. सदर ठिकाणी निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. पाणी पुरवठा योजना ही अत्यावश्यक बाब असूनही शासन या कामांच्या बाबतीत गंभीर नाही. सांगली जिल्ह्यात एकाच ठेकेदाराने अनेक ठिकाणी कामे घेतल्याने ही कामे चालू नसून अशा लोकांना शासन पाठीशी घालत असणे व या योजना कधी पूर्ण करण्यात येण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१४) | ६५०६ | १० | महाराष्ट्र राज्य शासन निर्णयानुसार, ३० जून २०२२ पर्यंतची ग्रामपंचायतीची वीजपुरवठा थकबाकी ही शासन एम एस सी बी ला देणार होते व एक जुलै २०२२ नंतरची चालू देयके ग्रामपंचायत ने त्यांच्या निधीतून एमएसईबी ला नियमितपणे भरणे गरजेचे होते. परंतु शासनाने वरील नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार कोणताही निधी एम एस सी बी कडे आजअखेर वर्ग केला नाही. त्यामुळे ग्रामपंचायतींना आवश्यक त्या ठिकाणी नविन स्ट्रीटलाईट पोल उभे करण्याचे काम प्रलंबित झाले आहे. नवनवीन वाड्या वस्तीवर जाणाऱ्या रस्त्यावर स्ट्रीटलाईट नसल्याने रात्री नागरिकांना ये जा करणे धोक्याचे ठरत असणे, या बाबीचा विचार करून राज्य शासन हा निधी केव्हापर्यंत वर्ग करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- ७२,४१,७१,१६,०००/-**<br>**श्री. सहसराम कोरोटे** |
| (१५) | ६४४९ | १० | राज्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालक यांना आकृतीबंधात समाविष्ट करुन त्यांना त्यांच्या मानधनात वाढ करण्याचे आश्वासन देण्यात येवूनही अद्याप त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जुन-2024 च्यासुमारास निदर्शनास येणे, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संगणक परिचालक कर्मचारी संघटना NGP5768 च्या वतीने संपूर्ण राज्यामध्ये संगणक परिचालक ग्रामपंचायत मध्ये ग्रामीण भागातील संपुर्ण माहिती पोहचविण्याचे काम करीत असणे, गावातील प्रत्येक नागरिकांचा संबंध ग्रामपंचायत संगणक परिचालकांसोबत येत असणे, ग्रामपंचायत मधील संगणक परिचालकांना 6,6 महिने मानधन दिले जात नसणे, , संगणक परिचाकांना रु.12,252 रुपये असूनही त्यांना फक्त रु.6930 मानधन ही वेळेवर दिले जात नसणे, त्यामुळे त्यांवर त्यांच्या कुटूंबियांनावर उपासमारीची पाळी येणे, परिचालकांने मानधनात वाढ करण्यासाठी मोर्चा व आमरण उपोषण करण्यात येणे, जाने-2024 पासून 3 ते 5 हजार मानधन वाढ करण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, परंतू अदयाप पर्यंत त्यांची अंमलबजावणी करण्यात न येणे, त्यामुळे परिचालकांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, शासनाने राज्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालक यांना आकृतीबंधात समाविष्ट करुन त्यांना त्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुभाष धोटे** |
| (१६) | ६३७७ | १० | राजूरा (जिल्हा चंद्रपूर) ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झाले असून मोठमोठे खडे पडल्याने वारंवार अपघात होत आहे. या अपघातामूळे निपराध लोकांचा बळी जात असून अनेक जण जखमी होत आहे. त्यामूळे ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरूस्तीकरण करण, नवीन रस्त्याचे बांधकाम करणे याकरीता कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांचेकडे वारंवार रितसर प्रस्ताव पाठविलेला आहे. तसेच लोकप्रतिनिधींनी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सुध्दा या कामासाठी संबधित विभागाकडे निवेदन देऊन पाठपुरावा करित आहेत. तरी सुध्दा हे विकासाचे कामे अघापही मंजूर झालेले नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी उपरोक्त प्रस्तावात २५१५ अंतर्गत मंजूर होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- ७२,४१,७१,१६,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (१७) | ६३५८ | १०० | जि.पालघर, ता.पालघर येथील सातपाटी गावात पाच ते सहा वर्षांपासून गटार लाईन टाकणे तसेच जमिनीखालून विद्युत वाहिन्या टाकण्याचे कामे करण्यात आली आहेत. उक्त कामे करताना मु.सातपाटी गावातील सर्व रस्त्यांची डागडुजी न करता सर्व रस्ते तसेच ठेवण्यात आले आहेत. सदर खराब रस्त्यांमुळे गावातील सर्वसामान्य जनतेची गैरसोय होत आहे. तरी सातपाटी गावातील श्रीराम मंदिर ते पाटील आळी, समता मंडळ ते श्रीराम मंदिर, मुसलवाडी ते ब्राम्हणीपाडा तसेच गावातील विविध ठिकाणी रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण, डांबरीकरण (बांधकाम) करण्याची होत असलेली मागणी, सर्वसामान्य जनतेला वाहतुक व दळणवळणाची, शिक्षण, आरोग्याची चांगली सुखसुविधा उपलब्ध होणे गरजेचे असणे, सदरील रस्ते हे आंतरराज्य महामार्गाला जोडणारा महत्वाचा रस्ता असणे, या रस्याचे काम लवकरात लवकर करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१८) | ६५०२ | १० | कोकणात विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यात प्रत्येकवर्षी पडणाऱ्या अतिमुसळधार पावसामुळे मौजे वेळणेश्वर (बौध्दवाडी), ता.गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथील डोंगर उतारावर असलेल्या दुर्लक्षित दलित वस्तीत डोंगर उतारावरुन मोठ्या प्रमाणावर वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर डोंगरावरील मातीसह वस्तीतील डागडूजी केलेली पायवाट वाहून जात असते. सदर वस्तीतील डोंगर उतारावरुन वाहणाऱ्या पाण्यापासून संरक्षणाकरीता बंदिस्त नाळी/मोरी तसेच पावसाच्या पाण्यामुळे वाहणाऱ्या पायवाटेवर आवश्यक तेथे बांधकामासह सिमेंट क्रॉक्रिट अथवा चिरेबंदी पाखाडी बांधण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१९) | ६३३० | १० | आचरा-मालवण रस्त्यावरील आचरा भगवंतगड फाटा (शिक्षक कॉलनी ) ते चिंदर काजरा देव मार्ग पूर्णत: खड्डेमय बनला आहे. सुमारे दोन ते तीन कि.मी.रस्त्याची अक्षरश: चाळण झाली आहे. वाहन चालकांना या मार्गाने प्रवास करताना कसरत करुन वाहने चालवावी लागत आहेत. याचा फटका या मार्गावरुन ये-जा करणाऱ्या शेकडो वाहनधारकांना बसत आहे. या मार्गाने दुचाकी, रिक्षा, कार आदी वाहनधानक यांच्यामधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. हा मार्ग आचरा ते बांदिवडे-मसुरे तसेच, जिल्हा मुख्यालयापर्यन्त जाण्यासाठी जवळचा मार्ग आहे. या मार्गावरुन वाहतूक अलीकडील काळात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शाळा- |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कॉलेज, नोकरदार वर्ग, हॉस्पिटल-डॉक्टरकडे जाणारे रुग्ण या मार्गाने प्रवास करत असतात. खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताची भीती निर्माण असून मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग/मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, रत्नागिरी/कार्यकारी अभियंता, सा.बा.उपविभाग, सावंतवाडी यांनी केलेली कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ६३३१ | १० | मौजे धामापूर (खालचावाडा)-बौध्दवाडी-भाटीवाडी (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) या ग्रामीण मार्ग क्रमांक-४०२ रस्त्याच्या मजबूतीकरणासह-डांबरीकरणासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०२१ अखेर रुपये ४३०.३५ लक्ष इतका निधी उपलब्ध् करुन देणे, सदर रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम जि.प.च्या विविध योजनांतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करुन पूर्ण करण्याबाबत जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग (सा.बा.विभाग) यांना मा.सा.बा.मंत्री यांनी सूचना देणे, परंतु जि.प.सिंधुदूर्गने रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे डांबरीकरणाचे काम निधी अनुपब्धतेमुळे अद्यापपर्यंत हाती न घेतल्याने रेती वाहून नेणाऱ्या डंपरच्या वाहतूकीने संपूर्ण रस्त्यात खड्डे पडून वाहतूकीस खराब होणे, सन २०१८, २०१९, २०२०, २०२१, २०२२, २०२३ या सहा वर्षामध्ये झालेल्या जोरदार अतिवृष्टीने या रस्त्याला ठिकठिकाणी खड्डे, खाचखळगे पडलेले असल्याने रहिवाश्यांना या रस्त्याने चालणे, वाहन चालवणे धोकादायक झालेले आहे. मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग/मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, रत्नागिरी/कार्यकारी अभियंता, सा.बा.उपविभाग, सावंतवाडी आदींकडे सातत्याने या १.५ कि.मी. रस्त्याचे डांबरीकरण करुन देण्याबाबत सातत्याने मागणी करणे, शासनाचे ग्रामिण रस्ता म्हणून जाणीवपूर्वक झालेले व होत असलेले सततचे दुर्लक्ष, सुमारे 1.5 कि.मी.रस्त्याची अक्षरश: चाळण झालेली असून रस्ता वाहतुकीस धोकादायक झालेला आहे. जि.प.सिंधुदूर्ग सा.बा. विभागाने रस्त्याच्या डांबरीकरणाकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने नागरीकांमध्ये पसरलेली तिव्र् असंतोष, संतापाची लाट, मौजे धामापूर (खालचावाडा)-बौध्दवाडी-भाटीवाडी या रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्त्याचे डांबरीकरण करुन देण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ६३३२ | १० | मौ. हातीव, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथील बौध्दवाडी ते पूर्ण प्राथमिक शाळा नं.१ या रस्त्याचे काम सुरु झाले नसणे, या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, हातील हरपुडे ग्रामीण मार्ग क्र.४१ या सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करण्याची गरज असणे, रस्त्याअभावी स्थानिक नागरीकांना व मुलांना दूरच्या रस्त्याने जावे लागत असणे, जेष्ठ नागरीकांना, वृध्दांना व स्त्रियांना रस्त्यावर प्रवास करणे जिकरीचे झाले असणे, याकाडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिकात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनोन करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ६३५१ | १० | कळंबस्ते, मोहल्ला पोस्ट ऑफिस (ता.संगमेश्वर, जि.रत्नागरी) ते कब्रस्तानकडून दर्ग्याकडे जाणाऱ्या रस्ता अत्यंत खराब झाला असून वाहतुकीस अयोग्य झाला असणे, सदरच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याची आवश्यकता निर्माण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| (२३) | ६३६२ | १० | कोकणात विशेषत: रत्नागिरी जिल्हयात प्रत्येकवर्षी पडणाऱ्या अति मुसळधार पावसामुळे मौजे वेळणेश्वर (बौध्दवाडी), ता.गुहागर, जि.रत्नागिरी येथील डोंगर उतारावर असलेल्या दुर्लक्षित दलित वस्तीत डोंगर उतारावरुन मोठया प्रमाणावर वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर डोंबरावरील मातीसह वस्तीतील डागडुजी केलेली पायपाट वाहून जात असते. सदर वस्तीतील डोंगर उतारावरुन वाहणाऱ्या पाण्यापासून संरक्षणाकरीता बंदिस्त नाळी/मोरी तसेच पावसाच्या पाण्यामुळे वाहणाऱ्या पायवाटेवर आवश्यक तेथे बांधकामासह सिमेंट कॉक्रिट अथवा चिरेबंदी पाखाडी बांधण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ६३६६ | १० | उमरे मेन रस्ता कोंडउमरे (इजिमा क्र.६८) ता.देवरुख, जि.रत्नागिरी हा रस्ता वाहतुकीस योग्य नसणे, सदर रस्त्याचा उपयोग उमेर व कोंडउमरे या गावांना होत असणे, ग्रामस्थांना कोंडउमरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जावे लागत असणे, त्यामुळे रस्ता होणे फारच गरजेचे असणे, रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, सदरच्या रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२०२३ अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले असणे, मात्र अद्याप रस्त्याच्या कामास सुरुवात झाली नसणे, परिणामी ग्रामस्थांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |
| (२५) | ६३६९ | १० | निर्मलग्रुप ग्राम पंचायत ओझर (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) ते शौकत टोले चौकापर्यंत रस्त्यावर मोठाले खड्डे पडले असणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य झाला असणे, रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबबात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ५ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) ग्रामविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई